

# एक घरटे चिऊताई साठी

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालय ओतूर मध्ये २० मार्च जागतिक चिमणी दिवस राष्ट्रीय हरित सेना विभाग यांचे मार्फत साजरा करण्यात आला अशी माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली.'चिऊताई चिऊताई दार उघड' आठवतेय ही ओळ. फेसबुक, व्हाट्सअप्प च्या जमान्यात ही बालमित्रांची चिऊताई गायबच झाली आहे. भारतात सर्वात जास्त संख्या असणारा पक्षी म्हणून चिमणी परिचयाची आहे. माणसाच्या अगदी जवळच राहणारा हा पक्षी असून कीटक,धान्य,मध, शिजवलेले अन्न असे सर्व प्रकारचे खाद्य खातो.विणीचा हंगाम वर्षभर असू शकणारा पक्षी अशी ओळखही या पक्ष्याची आहे.

गवत, कापूस, पिसे, मिळतील त्या वस्तू वापरून घराचे छत,वळचणीच्या जागा, दिव्यांच्या मागे,झाडांवर असे कुठेही घरटे बांधतो.अलीकडे वाढत्या शहरीकरणामुळे चिमण्यांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. विशेषत: शहरां मध्ये मोबाईल टॉवर्समधून होणारे विद्युत् चुंबकीय उत्सर्जन,आधुनिक प्रकारच्या घरबांधणी पद्धतीमुळे,घरट्यां च्या जागांची अनुपलब्धता, अन्नाची अनुपलब्धता,शहरां मधील वाढते प्रदूषण तसेच शेतात होणारा रासायनिक खते व कीटकनाशक यांचा वापर यांसारख्या अनेक कारणांमुळे चिमण्यांची संख्या कमी होत आहे.२० मार्च हा दिवस दरवर्षी 'जागतिक चिमणी' दिवस म्हणून पाळला जातो. हा दिवस त्यांच्या संख्येबद्दल लोकांमध्ये जागृती घडवून आणण्यासाठी साजरा केला जातो.चिमण्यांचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे, तरी आपण पर्यावरण वाचवू या आणि चिमण्या वाढवू या. ही माहिती विद्यार्थ्यांना संतोष कांबळे यांनी दिली.

यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी चिऊताई साठी गवत , कागदी खोके आदींचा वापर करून घरटी तयार केली.ही घरे विद्यार्थ्यांनी आपल्या घराच्या बाहेर भिंतींना व झाडांना लावली याप्रसंगी ग्राम विकास मंडळ ओतूरचे सचिव प्रदीप गाढवे,पंकज घोलप,राजश्री भालेकर संजय हिरे ,अनिल उकिरडे ,अजित डांगे,भगवंता घोडे,राजाराम शिंदे ,संतोष कांबळे,मिलिंद खेत्री,विशाल चौधरी लक्ष्मण दुडे,मंगेश तांबे,अमित झरेकर,विजया गडगे,सोनाली माळवे,आशा गाडेकर,आसावरी गायकर, सोनाली कांबळे ,बाळासाहेब साबळे,अनिल जवरे,दिनेश ताठे,रंजीता पाटील,सरस्वती भताने,रसिका शेळके,ईश्वर ढमाले,योगेश फापाळे,अरविंद आंबरे आदी उपस्थित होते.




ठाणे : ठाणे जिल्हा बहुजन समाज पार्टी च्यावतीने घरगुती गॅस सिलेंडर वेळेवर उपलब्ध करून देणे, सिलेंडर काळा बाजार थांबवावा, छोटे व्यावसायिक व सर्वसामान्य कुटुंबांना होणाऱ्या त्रासातून मुक्तता मिळवून देण्यासाठी तात्काळ व ठोस कारवाई करावी यासाठी ठाणे जिल्हा अधिकारी कार्यालय येथे निवेदन देण्यात आले. ॲड.सुनील डोंगरे (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष बहुजन समाज पार्टी) यांच्या आदेशावरून आंदोलन करण्यात आले. प्रसंगी राजेशचंद्रा जैस्वार, विद्याधर किरतवडे, शंकर दयाल, बामसेफ कन्व्हेनर, राजाराम पाटील, मधुकर बनसोड, संतोष भालेराव, बाबासाहेब काळे, नसीम भाई, दिपकभाऊ खंदारे, सुरेन्द्र गौतम आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

**(फोटो - संतोष पडवळ)**

## सनी निम्हण यांच्या प्रयत्नातून औंध–डेक्कन बससेवा पुन्हा सुरू

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पुणे महानगर परिवहन महामंडळ (पीएमपीएमएल) तर्फे औंध ते डेक्कन जिमखाना दरम्यान धावणारी १०५ क्रमांकाची बससेवा पुन्हा सुरू करण्यात आली आहे. मागील काही महिन्यांपासून हा मार्ग बंद असल्याने औंध-बाणेर परिसरातील नागरिकांकडून सातत्याने सेवा सुरू करण्याची मागणी होत होती. नगरसेवक चंद्रशेखर उर्फ सनी निम्हण यांच्या पाठपुराव्यामुळे अखेर ही बससेवा पुन्हा सुरू झाली आहे.

आज सकाळी सुमारे ८.१५ वाजता पहिल्या बसचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी पीएमपीएमएलचे संचालक अजय खेडेकर, उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसेवक सनी निम्हण, नगरसेविका भक्ती गायकवाड, सपना छाजेड यांच्यासह आनंद छाजेड, शिरीष नाईकरे, रिपाई शिवाजीनगर युवक अध्यक्ष महादेव साळवे, मनोज दळवी, वसंत जुनावणे, निलेश गायकवाड, सुजाता पाटील, सूर्यकांत कळापुरे, सतीश तारू, मारुती पाटील, जॉन प्रकाश, मंगल जाधव, सुरेखा कुलकर्णी तसेच स्थानिक नागरिकआणि पीएमपीएमएल अधिकारी उपस्थित होते.

डीपी रोड परिसरात अनेक वर्षांपासून बंद असलेली ही बससेवा पुन्हा सुरू झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. ही सेवा सकाळी ५.३० ते रात्री ८.१५ पर्यंत सुरू राहणार असून या मार्गावर दररोज आठ फेऱ्या होणार आहेत. त्यामुळे औंध-बाणेर ते डेक्कन परिसरातील प्रवास अधिक सोयीस्कर होणार असल्याची प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### नगरसेवकांचा तिकीट काढून प्रवास



पीएमपीच्या नवीन बस मार्गाचा शुभारंभ झाला की अधिकारी, नेते हिरवा झेंडा काढून थांबतात. मात्र आज सनी निम्हण, पीएमपीएमएलचे संचालक अजय खेडेकर, उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसेविका भक्ती गायकवाड, सपना छाजेड यांच्यासह आनंद छाजेड यांनी तिकीट काढून पहिल्या बस फेरी मध्ये सामान्य नागरिकांसोबत प्रवास केला.

## स्नेहमेळावा उत्साहात संपन्न

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**


महादजी शिंदे विद्यालय, श्रीगोंदा येथील १९७६ च्या इयत्ता १० वीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा दि. २१ मार्च २०२६ रोजी ए स्टार हॉटेल व विद्यालय परिसरात उत्साहात पार पडला. या मेळाव्याच्या यशस्वी आयोजनाबद्दल कोअर कमिटीचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी त्यांचे मनापासून आभार मानले. तब्बल ५० वर्षांनंतर वर्गमित्र पुन्हा एकत्र आल्याने या कार्यक्रमाला विशेष भावनिक रंग चढला. सुरुवातीला ए स्टार हॉल येथे चहा-पानाचा कार्यक्रम पार पडला. त्यानंतर विद्यालयात आयोजित छोटेखानी कार्यक्रमाच्या सुरुवातीला कर्मवीर अण्णांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य दिलप भुजबळ सर होते.

## वेळेत निदान, योग्य उपचार आणि प्रतिबंध हीच टीबीवर मात करण्याची गुरुकिल्ली – डॉ. आनंद यन्नावार

### जागतिक क्षयरोग दिनानिमित्त मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे जनजागृतीचे आवाहन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

जागतिक क्षयरोग दिनाच्या निमित्ताने मेडिकव्हर हॉस्पिटल्स, पुणे यांनी क्षयरोग (टीबी) या गंभीर संसर्गजन्य आजाराबाबत जनजागृती वाढवण्याचे आणि वेळेवर उपचार घेण्याचे आवाहन केले आहे. "वेळेत निदान, योग्य उपचार आणि प्रतिबंध हीच टीबीवर मात करण्याची त्रिसूत्री आहे," असे प्रतिपादन फुफ्फुसरोग तज्ज्ञ डॉ. आनंद यन्नावार यांनी केले. टीबी हा प्रामुख्याने फुफ्फुसांवर परिणाम करणारा आजार असून तो संक्रमित व्यक्ती खोकताना किंवा शिंकताना हवेद्वारे पसरतो. हा आजार पूर्णपणे बरा होऊ शकतो, तरीही उशिरा निदान आणि अपूर्ण उपचारांमुळे त्याचा प्रसार



वाढत असल्याचे तज्ज्ञांनी स्पष्ट केले. भारतात टीबीचा मोठा भार असल्यामुळे जनजागृती आणि वेळेवर वैद्यकीय उपचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात. डॉ. यन्नावार यांनी सांगितले की, दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ खोकला, छातीत दुखणे, ताप, वजन कमी होणे आणि थकवा ही लक्षणे दुर्लक्षित करू नयेत. "लवकर तपासणी आणि अचूक निदान केल्यास टीबीवर प्रभावी नियंत्रण मिळवता येते आणि गुंतागुंत टाळता येते," असे त्यांनी नमूद केले. तसेच, औषधांचा पूर्ण कोर्स घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. अपूर्ण किंवा अनियमित उपचारांमुळे ड्रग-रेझिस्टंट टीबी निर्माण होऊ शकतो, ज्यावर उपचार करणे अधिक कठीण ठरते. चांगली स्वच्छता, संतुलित आहार आणि नियमित आरोग्य तपासण्या यामुळे टीबीचा धोका कमी करता येतो. मेडिकव्हर हॉस्पिटल्स, पुणे येथे अत्याधुनिक निदान सुविधा आणि अनुभवी तज्ज्ञांची टीम उपलब्ध असून रुग्णांना वेळेवर आणि प्रभावी उपचार दिले जातात. जागतिक क्षयरोग दिनानिमित्त रुग्णालयाचा स्पष्ट संदेश आहे की, जनजागृती, जबाबदारी आणि योग्य उपचारांच्या मदतीने टीबीमुक्त समाज निर्माण करणे शक्य आहे.

## विवो Y51 प्रो 5G लॉंच; दमदार परफॉर्मन्स, 7200mAh बॅटरी आणि स्मार्ट फीचर्सची जोड

- दीर्घ बॅटरी लाईफ आणि AI फीचर्समुळे वापरकर्त्यांसाठी नवा पर्याय

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**




स्मार्टफोन बाजारात आपली Y-सिरीज अधिक मजबूत करत विवोने विवो Y51 प्रो 5G हा नवा स्मार्टफोन लॉंच केला आहे. स्टायलिश डिझाइनसोबत दमदार परफॉर्मन्स, दीर्घ बॅटरी लाईफ आणि स्मार्ट फीचर्स यांचा समतोल साधणारे हे डिव्हाइस विशेषतः दैनंदिन वापर आणि दीर्घकालीन पॉवरची गरज असलेल्या वापरकर्त्यांसाठी डिझाइन करण्यात आले आहे. या स्मार्टफोनमध्ये मीडियाटेक डायमेन्सिटी 7360 टर्बो चिपसेट देण्यात आला असून, तो मल्टीटास्किंग, गेमिंग आणि मनोरंजनासाठी सुरळीत आणि जलद परफॉर्मन्स प्रदान करतो. ९.२ लाखांहून अधिक AnTuTu स्कोअरसह हा फोन प्रतिसादक्षम अनुभव देतो. 8GB पर्यंत रॅम, एक्स्टेंडेड रॅम सपोर्ट आणि 128GB/256GB स्टोरेजमुळे ॲप्समध्ये सहज स्विचिंग आणि स्थिर परफॉर्मन्स मिळतो. या फोनचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ७२००mAh ची मोठी बॅटरी, जी ४४W फ्लॅशचार्जसह येते. त्यामुळे एकदा चार्ज केल्यानंतर फोन आरामात पूर्ण दिवस, तसेच हलक्या वापरात दोन दिवस टिकतो. बॅटरी हेल्थ मॅनेजमेंट टेक्नॉलॉजीमुळे दीर्घकाळ चांगली कार्यक्षमता राखली जाते. तसेच रिव्हर्स चार्जिंगमुळे इतर डिव्हाइसही चार्ज करता येतात. फोटोग्राफीसाठी या फोनमध्ये ५०MP AI-आधारित मुख्य कॅमेरा देण्यात आला आहे, जो विविध प्रकाशात स्पष्ट आणि आकर्षक फोटो टिपतो. EIS सपोर्टमुळे व्हिडिओ अधिक स्थिर राहतात, तर 4K व्हिडिओ रेकॉर्डिंग, ड्युअल व्ह्यू व्हिडिओ आणि लाइव्ह फोटोसारखी फीचर्स वापरकर्त्यांचा अनुभव अधिक समृद्ध करतात. IP68 आणि IP69 रेटिंगमुळे पाण्याखालील फोटोग्राफीचाही पर्याय उपलब्ध आहे. सॉफ्टवेअरच्या बाबतीत, हा फोन OriginOS 6 सह येतो, ज्यामध्ये AI क्रिएशन, AI नोट्स, AI ट्रान्सक्रिप्ट असिस्ट, सर्कल टू सर्च यांसारखी स्मार्ट फीचर्स दिली आहेत. हेल्मेट सपोर्ट असलेले फेस अनलॉक हे रायडर्ससाठी खास वैशिष्ट्य ठरते. डिझाइनच्या बाबतीत, क्वाड-कर्व्ड बॅक आणि स्लीक फ्रेममुळे फोन प्रीमियम दिसतो आणि हाताळायला आरामदायक आहे. फेस्टिव्ह रेड आणि नोबल गोल्ड या आकर्षक रंगांमध्ये तो उपलब्ध आहे. SGS सर्टिफिकेशनसह मजबूत बिल्ड आणि ड्रॉप-रेझिस्टन्समुळे फोन टिकाऊ ठरतो. मनोरंजनासाठी, ६.७५ इंचाचा 120Hz डिस्प्ले आणि 1250 निट्स ब्राइटनेस मिळतो, ज्यामुळे व्हिडिओ आणि गेमिंगचा अनुभव अधिक स्मूथ आणि आकर्षक बनतो. 400% व्हॉल्यूम असलेले ड्युअल स्टिरिओ स्पीकर्स आणि AI SuperLink कनेक्टिव्हिटीमुळे एकूणच हा स्मार्टफोन प्रवासात आणि दैनंदिन वापरात उत्कृष्ट पर्याय ठरतो. एकूणच, दमदार बॅटरी, प्रगत कॅमेरा आणि AI फीचर्सच्या जोरावर विवो Y51 प्रो 5G हा मध्यम बजेटमध्ये एक मजबूत स्पर्धक म्हणून समोर आला आहे.

## कलाविष्कार सोहळा

**वैजापुर : (समर्थ गांवकरी)**

लांडेवस्ती (केंद्र - डवाळा) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलनाचा कलाविष्कार हा कार्यक्रम विवीध सांस्कृतिक कार्यक्रमांनी संपन्न झाला - प्रथम मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन केले. मान्यवरांचे स्वागत झाल्यानंतर यावेळी गणपती गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली त्यानंतर गिरीश का गाना सुनेगा , स्कुल चले हमे, अंगात आल या..., शाळा मराठी माझी शाळा, झुकेगा नही साला, बाईपण भारी देवा, मै तो कोल्हापुर से आई हूँ , साडीला सर्फ लाऊन धुवुन टाक, बोलो तारा रारा, ओ हो हो तारे गीन, डिपारी डिपांग, देशभक्ती पर गीत, युगात मांडली, मराठ्यांची पोरं, आम्ही शिवकन्या, आदिवासी ओ माझा रे, रंगीला, आपत्ती यारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर , कुणी नाही केल.

## 'तेरे इश्क में'चा वर्ल्ड टीव्ही प्रीमियर २७ मार्चला

- सोनी मॅक्सवर रात्री ८ वाजता प्रेक्षकांना भावनिक प्रवासाचा अनुभव

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**




हिंदी चित्रपटसृष्टीतील बहुप्रतीक्षित भावनिक चित्रपट *"तेरे इश्क में"*चा भव्य वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर येत्या २७ मार्च रोजी रात्री ८ वाजता सोनी मॅक्सवर होणार आहे. 'रांझना' या गाजलेल्या चित्रपटानंतर तब्बल बारा वर्षांनी अभिनेता धनुष आणि दिग्दर्शक आनंद एल. राय ही जोडी पुन्हा एकत्र येत प्रेक्षकांना वाराणसीच्या घाटांवरच्या भावविश्वात घेऊन जाणार आहे. 'तेरे इश्क में'ला 'रांझना'चा आध्यात्मिक वारसदार मानले जात असून, या चित्रपटात धनुष 'शंकर'च्या भूमिकेत अधिक गडद आणि गुंतागुंतीचे पात्र साकारताना दिसतो. प्रेम, वेड आणि त्याची किंमत या भावनांचा तीव्र अनुभव या कथेतून मांडण्यात आला आहे. गंगेच्या काठावर धोतीमधील धनुषचा लूक प्रेक्षकांसाठी खास आकर्षण ठरत आहे. या चित्रपटात अभिनेत्री कृती सॅनॉननेही प्रभावी भूमिका साकारली असून, तिच्या अभिनयाने कथेला अधिक खोली प्राप्त झाली आहे. दिग्दर्शक आनंद एल. राय यांनी छोट्या शहरातील वास्तववादी वातावरण जिवंत केले असून, संगीतकार ए. आर. रहमान यांच्या संगीताने कथानकाला वेगळी उंची दिली आहे. चित्रपटाविषयी बोलताना आनंद एल. राय म्हणाले की, "ही कथा प्रेमाच्या गहन आणि परिपक्व रूपाचा शोध घेणारी आहे. शंकरच्या भूमिकेसाठी धनुष हीच माझी पहिली पसंती होती, कारण तो या भावनिक गुंतागुंतीला योग्य न्याय देऊ शकतो." सशक्त अभिनय, भावपूर्ण संगीत आणि वेगळ्या कथानकामुळे 'तेरे इश्क में' प्रेक्षकांना एक संस्मरणीय सिनेमॅटिक अनुभव देण्याचे वचन देतो. सोनी मॅक्सवर होणारा हा प्रीमियर देशभरातील लाखो प्रेक्षकांपर्यंत पोहोचणार असून, हा कार्यक्रम मोठ्या पडद्यावरील प्रदर्शनाइतकाच प्रभावी ठरणार आहे.

'तेरे इश्क में'चा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर २७ मार्च रोजी रात्री ८ वाजता फक्त सोनी मॅक्सवर पाहायला विसरू नका.

# रिपब्लिकन पक्षाला राष्ट्रीय पक्ष मान्यता मिळवून देणार

### रामदास आठवले यांचा निर्धार

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



रिपब्लिकन पक्षाला सर्वसमावेशक स्वरूप प्राप्त करून देऊन राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळवून देण्याचा निर्धार आठवले गटाचे प्रमुख व केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केला. पाच राज्यांमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकींपैकी चार राज्यात रिपब्लिकन पक्ष आपले उमेदवार उभे करणार असल्याचेही त्यांनी पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले. यावेळी आरपीआय चे पुणे शहर अध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरोदे, जनरल सेक्रेटरी गौतम सोनवणे, सचिव बाळासाहेब जानराव, उपमहापौर परशुराम वाडेकर, चंद्रकांता सोनाकांबळे, सूर्यकांत वाघमारे, महिपाल वाघमारे, नीलेश अल्हाट, हिमाली कांबळे, निशा मानवतकर, बसवराज गायकवाड, विशाल शेवाळे, जयदेव रंधवे, नीलेश रोकडे, सचिन मानवतकर, विरेन साठे आदि पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

रिपब्लिकन पक्ष हा सर्व जाती धर्मांचा, समाजातील उपेक्षित वर्गाचा, तरुणांचा महिलांचा पक्ष असून त्याला सर्वसमावेशक स्वरूप देण्याचे कार्य हाती घेणार असल्याचे आठवले यांनी सांगितले. तामिळनाडू, आसाम, केरळ आणि पद्दूचेरी या राज्यात आपला पक्ष विधानसभा निवडणुकीत उमेदवार उभा करणार आहे, असेही ते म्हणाले. रिपब्लिकन पक्षाच्या निवडक कार्यकर्त्यांचा मेळावा पोर्ट ब्लेअर येथे आयोजित केला जाणार असून त्यात पक्ष विस्ताराच्या दृष्टीने धोरण निश्चित करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे पुण्यात देखील बैठक घेऊन पक्ष विस्ताराच्या दृष्टीने नियोजन करण्यात येणार आहे, असेही आठवले यांनी सांगितले. समाजातील भेदभाव दूर करण्यासाठी राजकीय पक्षांबरोबरच स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते आणि सर्व नागरिकांनी प्रयत्न करण्याची आवश्यकता ही त्यांनी व्यक्त केली.

मुंबई महापालिका निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला महायुतीकडून जागा मिळाल्या नसल्या तरीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेची एक जागा, दोन महामंडळाचे अध्यक्षपद आणि पुरेशा प्रमाणात महामंडळांची सदस्य पदे देण्यात येतील अशी ग्वाही दिली असल्याचेही आठवले यांनी नमूद केले. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत घातपाताची शक्यता आपल्याला वाटत नाही. मात्र, या विमान अपघाताची सखोल चौकशी व्हावी, संबंधित विमान कंपनीवर कठोर कारवाई व्हावी अशीच आपली देखील मागणी असल्याचे आठवले यांनी सांगितले.

भोंदू बाबा कॅप्टन अशोक खरात प्रकरणाबाबत बोलताना, राज्यातील सर्वच भोंदू बाबांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करतानाच मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यासाठी पुढाकार घेतल्याचे आठवले म्हणाले. कॅप्टन खरात याच्या गुन्ह्यांची व्याप्ती बघता त्याला फाशीची शिक्षा व्हावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

### अनेक कार्यकर्त्यांचा रिपब्लिकन पक्षात प्रवेश

आज रामदासजी आठवले यांच्या हस्ते विविध पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा रिपब्लिकन पक्षात प्रवेश झाला. यामध्ये हुलगेश मर्याप्पा चलवादी. (माजी प्रदेश प्रभारी, बीएसपी ) अनिल कुमार त्रिपाठी. पुणे जिल्हा प्रभारी, बीएसपी. भीम सिंह चलवादी. (अध्यक्ष, कर्नाटक आंध्र तेलंगणा राज्य, चलवादी माळा विकास महासंघ), दीप चिंचोलीकर (हायकोर्टाचे वकील) मूळ, लातूर बीएसपी चे लोकसभा उमेदवार, अविनाश इंद्रजीत मस्के (निवृत्त, आयपीएस अधिकारी.), विकास जावळे (निवृत्त, प्रॉव्हिडंट फंड कमिशनर) महाराष्ट्र राज्य., प्रकाश सोनवणे. सुधीर वाघमोडे. संतोष आरडे. (माजी नगरसेवक) यांचा समावेश आहे. हे पक्ष प्रवेश घडवून आणन्यासाठी प्रदेश सचिव बालासाहेब जानराव ,पुणे शहर अध्यक्ष संजय सोनवणे यानी विशेष प्रयत्न केले.

### संजय सोनवणे हेच पक्षाचे अधिकृत शहराध्यक्ष

पुणे शहरात रिपब्लिकन पक्ष आठवले गटाचे दोन शहराध्यक्ष असल्याबाबत विचारणा केली असता, संजय सोनवणे हेच निवडून आलेले पक्षाचे अधिकृत शहराध्यक्ष असल्याचे आठवले यांनी स्पष्ट केले. इतर कोणी शहराध्यक्ष पदाचा दावा करीत असेल तर ते घटनाविरोधी आहे. सोनवणे हे कार्यकर्त्यांनी निवडून दिलेले अध्यक्ष असून त्यांचा तीन वर्षाचा कालावधी आहे. त्यापैकी पावणे दोन वर्ष पूर्ण झाली आहे. तीन वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर निवडणुकीद्वारेच नवीन शहराध्यक्ष निवडला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

# दक्षिणला उपसभापती पदावरच बोळवण

नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)



नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका महिला बालकल्याण समितीच्या उपसभापती पदासाठी नवीन नांदेड भागातील भाजपाच्या नगरसेविका सौ निरंजना राजु लांडगे यांच्या उपसभापती पदासाठी एकमेव नामनिर्देशन पत्र दाखल झाल्याने दि २४ मार्च रोजी होणाऱ्या बैठकीत बिनविरोध निवड होणार आहे.

नावा मनपाच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १९ व २० मध्ये भाजपा पक्षाचे नऊ पैकी नऊ नगरसेवक प्रचंड मताधिक्याने विजयी झाले होते त्यानंतर मनपाच्या स्थायी समिती व महिला बालकल्याण समिती वर नवीन नांदेड भागातील सौ.दिपाली संतोष मोरे व अभिषेक सौदे यांची स्थायी समिती सदस्य पदी तर महिला बालकल्याण समिती सदस्य पदी सुलोचना धोंडीबाराव काकडे व सौ.निरंजना राजु लांडगे यांची नियुक्ती करण्यात आली होती. दि २४ मार्च रोजी होणाऱ्या स्थायी समिती सभापती पदासाठी व महिला बालकल्याण सभापती उपसभापती पदासाठी होणाऱ्या निवडणुकीत नवीन नांदेड भागाला प्रतिनिधित्व मिळुन स्थायी सभापती किंवा महिला बालकल्याण सभापती पद मिळेल ही अपेक्षा होती मात्र उपसभापती पद मिळेल अशी शक्यता होती समितीवरील सौ.दिपाली मोरे व अभिषेक सौदे यांनी सभापती पदासाठी तर सुलोचना धोंडीबाराव काकडे यांनी महिला बालकल्याण सभापती पदासाठी माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण व भाजपा महानगर अध्यक्ष माजी आमदार अमरभाऊ राजूरकर यांच्या सह वरीष्ठ पदाधिकारी यांच्या कडे मागणी केली होती, मनपा सभागृह नेते अॅड,महेश कनकदंडे यांनी नामनिर्देशन पत्र घेण्याचा दिवशी सहा नामनिर्देशन पत्र घेतले विरोधी पक्षांकडून कोणीही नामनिर्देशन पत्र घेतले नसल्याने ही निवडणूक बिनविरोध होणार हे निश्चित झाल्याने नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या दिवशी दि २३ मार्च रोजी स्थायी समिती सभापती पदासाठी विरेंद्रसिंघ गाडीवाले व महिला बालकल्याण सभापती पदासाठी सौ.सदिच्छा सोनी व उपसभापती सौ.निरजंना राजु लांडगे यांच्या प्रत्येकी एक एक अर्ज निवडणूक अधिकारी तथा उपायुक्त अजितपाल सिंग संधू यांच्या कडे दाखल केल्याने ही निवडणूक बिनविरोध होणार आहे. मात्र नवीन नांदेड भागाला महिला बालकल्याण उपसभापती पदावरच प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे.

सिडको हाडको दक्षिण भागातील प्रभाग क्र १९ व प्रभाग क्र २० या दोन प्रभागा मध्ये ९ पैकी ९ जागेवर भाजपाचे दक्षीण मध्ये पहिल्यांदा च एक हाती सत्ता देऊन प्रचंड मतानी जनतेने निवडुन दिले मात्र भाजप पक्षाने दक्षिण परिसराला स्थायी समिती सभापती किंवा महापौर .उपमहापौर हे पद मिळेल अशी अपेक्षा होती मात्र फक्त उपसभापती पदावर बोळवण केल्याचे मत सर्व सामान्य नागरीकांतुन चर्चा ला उधाण आले आहे.

# आंतरराष्ट्रीय कला स्पर्धेत श्री कच्छ अंजार लोहाणा बोर्डिंग स्कूलच्या विद्यार्थ्यांचे यश

मुंबई : (समर्थ गांवकरी)



रंगोत्सव सेलिब्रेशन संस्था, मुंबईतर्फे आयोजित आंतरराष्ट्रीय कला स्पर्धेत श्री कच्छ अंजार लोहाणा बोर्डिंग स्कूलच्या १५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत उल्लेखनीय कामगिरी केली. विविध शाळांमधील स्पर्धेत विद्यार्थ्यांनी दुसरा व तिसरा क्रमांक पटकावत शाळेचे नाव उज्ज्वल केले. स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल विजेत्यांसह गुणवंत विद्यार्थ्यांना पदके, चषक, प्रमाणपत्रे आणि भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला आणि कलागुणांना मिळालेल्या या यशामुळे शाळेत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. याशिवाय शाळेला ५ पैकी ४.५ स्टार्सचा 'जागतिक शिक्षण प्रतिष्ठा पुरस्कार' (World Education Prestige Award) प्रदान करण्यात आला. शिक्षणाच्या दर्जाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या उपक्रमांची दखल घेत हा सन्मान देण्यात आल्याचे सांगण्यात आले. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांनी सर्व विजयी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, समर्पण आणि सर्जनशीलतेच्या जोरावर हे यश मिळवले असून ही संपूर्ण शाळा व समाजासाठी अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा स्पर्धा अत्यंत महत्त्वाच्या असल्याचे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य महत्त्वाचे ठरल्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले.

# कंधारकरांनो मॉर्निंग वॉकला जाताय तर सावधान



कंधार : (समर्थ गांवकरी)

येथील गेल्या काही वर्षापासून पॉवर हाउस ते मुखेड फाटा हा सकाळी सकाळी मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या नागरिकांना रस्त्यातून खड्डा की खड्ड्यात रस्ता अशी परिस्थिति असताना ग्रेट मराठा बारच्या थोड पुढे मुख्य रस्त्यावर अज्ञात व्यापाऱ्याने कोंबडीचे पंख आणि त्यातील घाण चक्क रस्त्यावर टाकल्याने मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या नागरिकांना इन्फेक्शन झाल्याची माहिती येथील नागरिकांनी दिली. त्यामुळे आरोग्य सुदृढ करण्यासाठी जाणारे नागरिक रोगराई तर घेऊन येत नाहीत ना, अशी भीती निर्माण झाली आहे. याच रस्त्यावर अवघ्या काही अंतरावर नगरपालकीचे कचरा व्यवस्थापनाची जागा आहे.याच मार्गावरून शहरातील घंटा गाडी कचऱ्याचे व्यवस्थापन करणारी वाहने ये जा करतात तरी त्यांना ही गठडे दिसत नसतील का? असा ही प्रश्न पालिका प्रशासनाला नागरिक करीत आहेत. भरतीसाठी विद्यार्थी ,ज्येष्ठ नागरिक या ठिकाणी दररोज स्वच्छ हवा मिळावी आणि आरोग्य सुदृढ रहावे, यासाठी मॉर्निंग वॉक करण्यासाठी शहरातील ज्येष्ठ नागरिक, प्रतिष्ठित नागरिकही या रस्त्याने येतात. एकीकडे रस्त्याची चाळण अन् याच रस्ता परिसरात दररोज प्रचंड दुर्गंधी, घाण पसरल्यामुळे तोंडाला रुमाल बांधून ते ठिकाण पार करावे लागत आहे. या दुर्गंधीमुळे ७ ते ८ जणांना इन्फेक्शन झाल्याची धक्कादायक माहिती येथे येणाऱ्या नागरिकांनी दिली. तर सुदृढ आरोग्यासाठी येणाऱ्या नागरिकांना रोगराईच घेऊन जावी लागत आहे. सध्या हे नागरिक 'मॉर्निंग वॉक नको रे बाबा' असे म्हणण्याची वेळ आली असून या परिसरात दररोज घाणीत वाढ होत आहे. तो चिकन व्यापारी कोण? त्याला कोणाचे अभय आहे,अशा प्रश्नाची चर्चा मॉर्निंग वॉक करणारे नागरिक करीत असून या चिकन व्यापाऱ्याला पुन्हा हे होणार नाही यासाठी तंबी देतील का?. असा प्रश्न करीत पालिका प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी मॉर्निंग वॉकला येणाऱ्या नागरिकांनी केली आहे.

# सिडकोत ईद उत्साहात साजरी

नांदेड : (समर्थ गांवकरी)

सिडको हडकोतील लोकांनी मुजामपेट ईदगाह मैदानावर सकाळी साडे आठ वाजता नमाज अदा करण्यात आली. ईद उल फित्र रमजान महिना ईस्लाम धर्माचा सर्वात मोठा सण मानला जात असतो. पूर्ण एक महिना रोजे धरल्यानंतर मुस्लिम बांधव ईद साजरी करतात. नमाज अदा केल्यानंतर मौलवी यांनी संपूर्ण देशात हिंदू मुस्लिम बांधवता भाईचारा नांदावा, बळी राजा सुखी व्हावा म्हणून प्रार्थना करण्यात आली. नमाजनंतर गळाभेट घेवून मुस्लिम बांधवांनी एक दुसऱ्याला रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या. सिडको येथील सामाजिक कार्यकर्ते तथा सिडको ब्लॉक कॉंग्रेस कमिटचे उपाध्यक्ष शेख मोईन लाठकर यांच्या निवास्थानी रमजान ईद निमित्त शिरखुरम्याचा स्वाद घेण्यात आला.

# अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडीनंतर आता सभापतीपदासाठी मोर्चेबांधणी

*मिलिंद वाळंज यांचे नाव आघाडीवर : संतोष राऊत, तुषार थोरात, अमोल नलावडे यांच्या नावांची चर्चा*

पुणे : (समर्थ गांवकरी)



पुणे जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाची निवडणूक प्रक्रिया पार पडल्यानंतर आता सर्वांचे लक्ष विषय समिती सभापतींच्या निवडीकडे लागले आहे. अध्यक्षपदी वीरधवळ जगदाळे (दौंड) आणि उपाध्यक्षपदी विवेक वळसे-पाटील (आंबेगाव) यांची वर्णी लागल्याने, आता प्रादेशिक समतोल साधण्यासाठी मुळशी , मावळ तालुक्याला झुकते माप मिळण्याची शक्यता आहे. यामध्ये पौड गटाचे तरुण सदस्य आर्किटेक्ट मिलिंद वाळंज यांचे नाव अग्रक्रमाने चर्चेत आहे.

जिल्हा परिषदेत अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसचे निर्विवाद वर्चस्व असून, बांधकाम, समाजकल्याण, महिला व बालकल्याण आणि कृषी व पशुसंवर्धन या चार समित्यांच्या सभापतीपदासाठी इच्छुकांनी जोरदार हालचाली सुरू केल्या आहेत. सर्व समित्या ग्रामीण विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या मानल्या जातात . अध्यक्ष उपाध्यक्ष पद अनुभवी नेतृत्वाखाली दिल्याने खालील समित्यांसाठी युवा उमेदवारांची वर्णी लागण्याची शक्यता आहे . मिलिंद वाळंज , संतोष राऊत , तुषार थोरात , अमोल नलावडे यासारख्या युवा चेहऱ्यांना संधीची शक्यता असून त्यामध्ये मिलिंद वाळंज हे स्वतः आर्किटेक्चर पदवीधारक असून त्यांना उद्योग आणि सामाजिक क्षेत्राचा दांडगा अनुभव आहे. वारकरी संप्रदायाचा वारसा आणि उच्चशिक्षित युवा चेहरा ही त्यांची जमेची बाजू मानली जात आहे. त्यांच्या निवडीमुळे जिल्ह्यातील रस्ते आणि इमारतींच्या प्रलंबित कामांना तांत्रिक गती मिळेल, असा विश्वास कार्यकर्त्यांमधून व्यक्त होत आहे. आता पक्षश्रेष्ठी कोणाच्या गळ्यात सभापतीपदाची माळ घालतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. राष्ट्रवादी पक्षाने नेहमीच राजकारणात तरुणांना प्राधान्य देण्याची आणि कर्तबगार चेहऱ्यांना संधी देण्याची भूमिका घेतली आहे. याच धोरणाचा भाग म्हणून पुणे जिल्हा परिषदेच्या अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या बांधकाम सभापतीपदी पौड गटातील तरुण आणि धडाडीचे नेते मिलिंद वाळंज यांची वर्णी लागण्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे. मिलिंद वाळंज हे केवळ राजकीय नेते नसून ते आर्किटेक्चर पदवीधर आहेत. व्यवसायाने वास्तुरचनाकार असल्याने त्यांना बांधकामातील तांत्रिक बाबी, नकाशे आणि नियोजनाचा दांडगा अनुभव आहे. तरुणांना संधी दिल्यास पक्षासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची एक मोठी फळी उभी राहू शकते, हे वाळंज यांच्या माध्यमातून यशस्वी होण्याची चिन्हे आहेत. सुशिक्षित आणि कामाची जाण असलेला तरुण चेहरा समोर आल्यास तरुणांचा ओढा पक्षाकडे अधिक वाढण्यास मदत होणार आहे.

# आयुष्यमान आरोग्य मंदिरात चक्क एक्सपायरी झालेल्या औषधांचा वापर

## जागरूक नागरिक संदीप महाजन यांनी उघड केला हा प्रकार

टिटवाळा : (समर्थ गांवकरी)




केडीएमसीच्या टिटवाळा येथील आयुष्यमान आरोग्य मंदिरात चक्क एक्स्पायरी झालेल्या औषधांचा वापर करण्यात येत असल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला असून जागरूक नागरिक संदीप महाजन यांनी हा प्रकार उघडकीस आणलेला आहे.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, संदीप महाजन हे जागरूक नागरिक रुख्मिणी गार्डन बिल्डिंग नंबर 1 मध्ये राहतात. त्यांची सहा वर्षांची मुलगी दिशा महाजन हिला जुलाबाचा त्रास असल्यामुळे त्यांनी तिला बाजूच्याच केडीएमसीच्या आयुष्यमान आरोग्य मंदिर येथे नेले. तेथे त्यांनी केसपेपर काढून डॉक्टरांना दाखवून औषधे घेतली असता त्यातील "सनडेम" नावाच्या औषधाची एक्सपायरी तारीख उलटलेले त्यांना देण्यात आले. त्यांनी घरी आल्यावर मुलीला औषध पाजताना सहज बघितले असता सनडेम औषधाच्या बाटलीवर मार्च 2024 सालाची मॅन्युफॅक्चर ची तारीख तर एक्सपायरी तारीख फेब्रुवारी 2026 ही दिसून आली. त्यांनी तात्काळ पुन्हा दवाखान्यात धाव घेऊन याबाबत विचारणा करण्याचा प्रयत्न केला असता. त्यांना उडवाउडवीची तसेच संबंधित डॉक्टर,कर्मचारी हे निघून गेले असून तुम्ही बाटली परत द्या अशी विनवणी करण्यात आली. मात्र संदीप महाजन यांनी सदरील बाटली परत न देता ती पुन्हा घरी घेऊन आले. त्यानंतर त्यांनी पत्रकार राजू टपाल यांना सदरील घटनेची माहिती व फोटो व्हिडिओ दिले. संदीप महाजन यांच्यामते मी एक शिक्षित पालक असल्यामुळे या बाबत जागरूक झालो मात्र टिटवाळा परिसरातील अनेक गोरगरिब नागरिक हे याबाबतची कुठलीही सावधगिरी न बाळगता अशा प्रकारचे औषधे सेवन करुन आपल्या जीविताशी खेळत आहेत. याबाबत केडीएमसीच्या मुख्य आरोग्य अधिकारी दीपा शुक्ल यांच्याकडे विचारणा केली असता संबंधित बाबतीची खातरजमा करून मी आपल्याला कळवते असे सांगितले. मात्र सदरील प्रकारामुळे केडीएमसीच्या आरोग्य विभागाचा गलथान कारभार पुन्हा एकदा उघड झाला आहे. याबाबत डॉ. तृणाली महातेकर यांनी ग्रामीण भागात कुणी काम करीत नाही मी कोव्हिड काळापासून काम करत आहे. माझ्याकडून चुकी झाली मला समजून घ्या असे सांगितले.

# रमजान ईद उत्साहात साजरी

श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)

श्रीगोंदा शहरासह संपूर्ण तालुक्यात रमजान ईद (ईद-उल-फित्र) शनिवार (दि. २१ मार्च) उत्साहात आणि शांततेत साजरी करण्यात आली. सकाळी १० वाजता शहरातील आनंदकर मळा येथील ईदगाह मैदानावर मौलाना जैनुद्दीन आतार यांच्या मार्गदर्शनाखाली सामुदायिक नमाज अदा करण्यात आली. या नमाजासाठी शहर व तालुक्यातील हजारो मुस्लिम बांधव अबालवृद्धांसह मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांची सामुदायिक नमाज सुफी संत शेख महंमद बाबा दर्गाह येथे पार पडली. रमजान महिन्यातील रोजांच्या (उपवासांच्या) सांगतेनंतर ईद साजरी करण्यात आली. रमजानच्या ३० दिवसांच्या उपवासानंतर शुक्रवारी सायंकाळी चंद्रदर्शन झाल्याने शनिवारी ईद साजरी करण्यात आली.

# भाजप दिवा-शीळ मंडळाचे निवासी प्रशिक्षण शिबीर उत्साहात संपन्न



ठाणे : (समर्थ गांवकरी)

भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या सुचनेनूसार आमदार निरंजन डावखरे व ठाणे जिल्हा अध्यक्ष संदीप लेले यांच्या मार्गदर्शनाखाली पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६ अंतर्गत ठाणे शहरातील भाजपा दिवा शीळ मंडळाचा निवासी प्रशिक्षण वर्ग "पार्वती हाईट्स, कल्याण शिळरोड, पडलेगाव येथे शनिवार, दिनांक 21 मार्च,२०२६ ते रविवार दिनांक 22 मार्च,२०२६ रोजी आयोजित करण्यात आला होता. सदर प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन भारत मातेच्या पूजनाने आणि दीपप्रज्वलन करून माजी आमदार सुभाष भोईर व ठाणे शहर जिल्हा सरचिटणीस डॉ. राजेश मढवी यांच्या हस्ते पार पडले. प्रसंगी वंदे मातरम आणि राज्यगीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रसंगी सदर शिबिरात मान्यवरांनी आपले विचार प्रशिक्षणार्थी समोर मांडले. मंडळात प्रशिक्षणास असणारे प्रभाग क्रमांक 29 च्या भाजप नगरसेविका वेदिका साहिल पाटील, जिल्हा व मंडळ कार्यकारिणी सदस्य, दिवा शीळ मंडळाचे पदाधिकारी, शक्तीकेंद्र प्रमुख इ. मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशिक्षणाचे प्रदर्शनीच उद्घाटन परीक्षित धमे ह्यांच्या हस्ते करण्यात आले. प्रशिक्षण वर्गाचे प्रमुख म्हणून मंडळ अध्यक्ष सचिन रमेश भोईर यांनी जबाबदारी सांभाळली तर साहिल पाटील, समीर चव्हाण, सपना भगत, वर्षा काळे यांनी संयोजक आणि सहसंयोजक म्हणून सहभाग नोंदवत सहकार्य केले प्रसंगी दिव्यातील भाजपचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्वारातीम विद्यापीठात शहीद दिन साजरा



नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथे सोमवार, दि. २३ मार्च, २०२६ रोजी 'शहीद दिन' साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षात आयोजित कार्यक्रमात शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव या महान क्रांतिकारकांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते शहीदांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून विनम्र श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी विद्यापीठातील विविध विभागांचे प्रमुख व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील व डॉ. पराग खडके, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे, नवोपक्रम व नवसंशोधन संचालक डॉ. शैलेश वाढेर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंग चिखलीकर तसेच रासेयो संचालक डॉ. मारुती गायकवाड यांचा समावेश होता. याशिवाय उपकुलसचिव डॉ. रवि सरोदे, कार्यकारी अभियंता तानाजी हुस्सेकर, तुकाराम भुरके, अनिरुद्ध राहेगांकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, अरुण धाकडे आणि डॉ. सुरेखा मुंगल यांचीही उपस्थिती होती.

# परिक्रमा तंत्रनिकेतन, काष्टी येथे 2025-26 मध्ये 368 विद्यार्थ्यांची ऐतिहासिक प्लेसमेंट

## मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल व सिव्हिल विभागांना १००% यश

श्रीगोंदा तालुका (समर्थ गांवकरी)



श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील बबनरावजी पाचपुते विचारधारा ट्रस्टच्या परिक्रमा शैक्षणिक संकुलातील परिक्रमा तंत्रनिकेतन महाविद्यालयाने प्लेसमेंटच्या क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सन 2025-26 या शैक्षणिक वर्षात प्लेसमेंट सेलच्या माध्यमातून तब्बल 368 विद्यार्थ्यांची विविध नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली असून, ही संस्था व विद्यार्थ्यांसाठी ऐतिहासिक कामगिरी ठरली आहे. विशेष म्हणजे मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल आणि सिव्हिल या प्रमुख विभागांना 100 टक्के प्लेसमेंट मिळाले आहे.

महाविद्यालयाचा दर्जेदार शिक्षणक्रम, उत्कृष्ट वसतिगृह सुविधा आणि सर्वांगीण विकासावर दिला जाणारा भर यामुळे राज्यभरातून विद्यार्थी येथे शिक्षणासाठी आकर्षित होत आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश महाविद्यालयाच्या गुणवत्तेची साक्ष देणारे आहे. या प्लेसमेंट उपक्रमात एस.पी.एम. ऑटोकोम सिस्टिम प्रा. लि. (रांजणगाव), जाबिल सर्किट इंडिया प्रा. लि., झेड. एफ. स्टेरिंग केअर इंडिया प्रा. लि., फियाट इंडिया ऑटोमोबाईल प्रा. लि., सिएट येडूसेस प्रा. लि., जॉन डीअर इंडिया प्रा. लि. (शिक्रापूर), टाटा ऑटोकॉम्प सिस्टिम प्रा. लि., बजाज ऑटो प्रा. लि. (चाकण), मायक्रोटेक डेव्हलपर लि., आर.पी. जी. प्रा. लि., जनरल इंडस्ट्रियल कंट्रोल प्रा. लि. आदी कंपन्यांनी सहभाग घेत विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण परिश्रम, तांत्रिक कौशल्य आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश मिळवले असल्याचे महाविद्यालयाकडून सांगण्यात आले. संस्थेच्या दर्जेदार शिक्षण पद्धतीसह योग्य मार्गदर्शन मिळाल्यास विद्यार्थी निश्चितच यशाच्या शिखरावर पोहोचू शकतात, हे परिक्रमा तंत्रनिकेतनने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

या यशाबद्दल संस्थापक माजी मंत्री बबनरावजी (दादा) पाचपुते, अध्यक्षा डॉ. सौ. प्रतिभाताई पाचपुते, आमदार विक्रमसिंह पाचपुते, मुख्य कार्यकारी अॅड. प्रतापसिंह पाचपुते, अॅकॅडेमिक डायरेक्टर सौ. इंद्रायणी पाचपुते, मुख्य प्रशासकीय अधिकारी अनिल पुंड, डेप्युटी अॅकॅडेमिक डायरेक्टर डॉ. संजीव कदमपाटील, प्राचार्य डॉ. प्रशांत सूर्यवंशी तसेच विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक, प्लेसमेंट अधिकारी आणि कर्मचारी वर्ग यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या यशामुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# श्रीगोंदा तालुक्यात रमजान ईद उत्साहात साजरी

## आढळगावात मुस्लिम बांधवांकडून सामाजिक सलोख्याचे दर्शन

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**



श्रीगोंद्यात शहरासह तालुक्यात रमजान ईद (ईद-उल फित्र) शनिवार (दि.२१ मार्च) उत्साहात व शांततेत पार पडली. सकाळी १० वाजता ईदची सामुदायिक नमाज शहरातील आनंदकर मळा येथील ईदगाह मैदानावर मौलाना जैनुद्दीन आतार यांच्या मार्गदर्शनाखाली नमाज पठण करण्यात आली. नमाजसाठी शहरासह तालुक्यातील मुस्लिम बांधव अबालवृध्दांसह हजारोच्या संख्येने उपस्थित होते. तर महिलांची ची सामुदायीक नमाज सुफी संत शेख महंमद बाबा दर्गाह येथे संपन्न झाली. रमजानच्या महिन्यात केलेल्या रोजा (उपवासाची) सांगता ईदच्या दिवशी झाली. रमजान महिन्याच्या ३० उपवासनंतर शुक्रवारी सायंकाळी चंद्रदर्शन झाल्याने, शनिवारी सर्वत्र ईद उत्साहात साजरी करण्यात आली. शहरातील विविध भागासह तालुक्यातील आढळगाव,काष्टी,कोळगाव, बेलावंडी, लोणी व्यंकनाथ, पेडगाव,यासह तालुक्यात सर्वत्र ईदगाह तसेच मशिदमध्ये सकाळी ९ वाजल्यापासून ईदच्या नमाजची व्यवस्था करण्यात आली होती. अनेक मशिदमध्ये मुस्लिम भाविकांनी नमाज अदा केली. ईदगाहच्या सामुदायिक नमाजनंतर धार्मिक एकात्मता आणि देशाच्या समृध्दी व शांततेसाठी अल्लाह चरणी प्रार्थना करण्यात आली. नमाजनंतर शहरातील कब्रस्तान व शेख महंमद बाबा दर्गामध्ये भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. घरोघरी शीरखुर्मा, गुलगुले या बेत होता.शहरात दिवसभर मुस्लिम बांधवांसह इतर समाजबांधवांनी एकमेकांची गळाभेट घेत ईदच्या शुभेच्छा देत होते. यानिमित्त शहरात सामाजिक एकतेचे दर्शनही घडले. ईदगाह येथे माजी मंत्री बबनराव पाचपुते, घनश्याम शेलार, मनोहर पोटे, नगराध्यक्षा प्रतिनिधी संजय खेतमाळीस, उपनगराध्यक्ष प्रतिनिधी अक्षय अनभुले, नगरसेवक शहाजी खेतमाळीस, एम. डी. शिंदे, प्रशांत गोरे, दादा औटी, नानासाहेब आंदनकर, अनिल महाराज औटी, अरविंद कापसे, नाना शिंदे, मुकुंद सोनटके भाऊसाहेब खेतमाळीस, दिपक शिंदे, रावसाहेब घोडके, अशोक आळेकर, योगशे भोसले, श्रीगोंदा पोलिस उप निरीक्षक वाघमारे,तसेच आढळगाव येथील जामा मस्जिद येथे अनिल ठवाळ,उत्तम राऊत,विलास भैलुमे, जिजाराम डोके,महेंद्र शिंदे,गणेश शिंदे,सत्यवान शिंदे, दत्ता चव्हाण,दादा गव्हाणे,देवराव शिंदे, रघुनाथ सूर्यवंशी,नानाभाऊ बोळगे, गणेश गाढवे,सह आर्दीनी ईद निमित्त मुस्लिम बांधवाना शुभेच्छा दिल्या.जामा मस्जिद ट्रस्ट च्या वतीने उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.ईद शांततेत होण्यासाठी पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ईदगाह मैदान व शहरासह श्रीगोंदा तालुक्यात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तर सायंकाळी ७ वा. सुफी संत शेख महंमद बाबा दर्गाह येथे ट्रस्ट व बाबांचे वंशज, नगरसेवक आमीनमाई शेख यांच्या वतीने हिंदू-मुस्लिम बांधवासाठी ईद मिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.तसेच आढळगाव येथील मुस्लिम बांधवांकडून धार्मिक एकोपा व सामाजिक सलोखा जपत सार्वजनिक शीरखुर्मा वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी हजेरी लावत शीरखुर्मा, गुलगुले, भजी याचा अस्वाद घेत शुभेच्छा दिल्या.

## अजमल दुबईने रणवीर सिंग यांची ब्रँड अम्बेसेडर म्हणून केली घोषणा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**




अजमल दुबईने रणवीर सिंग यांची आपल्या ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती जाहीर केली असून, "युअर अनसीन पॉवर" या त्यांच्या नवीनतम मोहिमेच्या लाँचसह एक धाडसी नव्या पर्वाची सुरुवात केली आहे. आपल्या पिढीतील प्रभावशाली कलाकार आणि अंतिम शोमॅन म्हणून ओळखले जाणारे रणवीर सिंग, सुगंधाच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व साजरे करण्याच्या ब्रँडच्या तत्त्वज्ञानाचे परिपूर्ण प्रतिनिधित्व करतात. ही भागीदारी अजमलच्या समृद्ध परफ्यूमरी वारशाला आधुनिक आणि नव्या पिढीतील सुगंधप्रेमींशी सुसंगत अशा समकालीन आवाजाशी जोडते. त्यांच्या स्टारडमच्या भव्यतेला साजेशा पद्धतीने, ही मोहीम आज देशभरातील ५७५+ पीव्हीआर स्क्रीनवर प्रदर्शित होत आहे। "युअर अनसीन पॉवर" ही मोहीम अजमल दुबईच्या तीन प्रतिष्ठित सुगंधांवर प्रकाश टाकते, ज्यापैकी प्रत्येक आधुनिक अभिव्यक्तीच्या वेगळ्या पैलूचे प्रतिनिधित्व करते. अरिस्टोक्रेट हा एक परिष्कृत वुडी-फ्रेश पुरुषी सुगंध असून त्यात ऊदचा सौम्य स्पर्श आहे, जो स्थिरता आणि खोली दर्शवतो; ऑरम समर हा एक उत्साही फ्रूटी-फ्लोरल युनिसेक्स सुगंध आहे, जो उबदारपणा आणि सहज आकर्षण व्यक्त करतो; तर विसाल लायल हा एक संवेदनशील वुडी सुगंध आहे, जो खास आणि संस्मरणीय क्षणांसाठी डिझाइन केला आहे. एकत्रितपणे, हे सुगंध करिष्मा आणि आत्मविश्वासाच्या विविध छटा दर्शवतात—जे रणवीर सिंग यांना या ब्रँडसाठी परिपूर्ण चेहरा बनवतात। रणवीर सिंग, ब्रँड ॲम्बेसेडर, अजमल दुबई म्हणाले, "अजमल दुबई म्हणजे वारसा, कौशल्य आणि सुगंध हा व्यक्तिमत्त्वाचा विस्तार आहे ही संकल्पना—ज्याशी मी वैयक्तिकरित्या जोडलेलो आहे. 'युअर अनसीन पॉवर' ही मोहीम त्या भावनेचे प्रतिबिंब आहे, ज्यामध्ये अरिस्टोक्रेट,ऑरम समर आणि विसाल लायल सारखे सुगंध आत्मविश्वास, ऊर्जा आणि जवळीक यांचे विविध पैलू दर्शवतात.

## ताल–सुरांच्या मिलाफाने पं. जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवाची बहारदार सांगता



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

तबल्याच्या सुमधुर तालावर फिरणारी पावले, त्यातून साकारलेले अप्रतिम कथक नृत्य, संतूरच्या मंद सुरांनी प्रफुल्लित झालेले वातावरण आणि सुस्वर गायन अशा सुर, ताल आणि लय यांच्या त्रिवेणी संगमातून विसाव्या पंडित जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवाचा बहारदार समारोप झाला.

तरंगिनी सांस्कृतिक प्रतिष्ठान आणि 'आपला परिसर' संस्थेतर्फे कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात आयोजित या महोत्सवाच्या शेवटच्या सत्रात ज्येष्ठ कथक नृत्यांगना नयनिका घोष, पद्मश्री पंडित सतीश व्यास (संतूर) आणि ज्येष्ठ गायिका श्रुती सडोलीकर-काटकर यांच्या सादरीकरणाने रसिकांना अविस्मरणीय अनुभव दिला.

शेवटच्या सत्राची सुरुवात नयनिका घोष यांच्या कथक नृत्याने झाली. धमार रागातील बंदिशींवर आधारित त्यांच्या नृत्याने सुरुवातीलाच प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. 'आज खेलो शाम रंगोली' या ठुमरीद्वारे त्यांनी होळीचा रंगतदार आविष्कार सादर करत श्रीकृष्ण विषयक गीत-नृत्याचा सुंदर संगम उलगडला. त्यांच्या सादरीकरणाला कार्तिक स्वामी (तबला), आशिष गंगावणे (पखवाज), यशवंत थिटे (हार्मोनियम) आणि अर्पिता वैशंपायन (स्वरसाथ) यांची उत्तम साथ लाभली. यावेळी माजी उपमहापौर अंकुश काकडे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

यानंतर पद्मश्री पंडित सतीश व्यास यांनी संतूर वादनाने मैफिलीला उंची दिली. धनकोरी कल्याण रागातील त्यांच्या सादरीकरणाने सभागृहातील वातावरण अधिकच भारावून गेले. रोहित मुजुमदार (तबला) यांनी त्यांना समर्थ साथ दिली. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

## रमजान ईद उत्साहात साजरी

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील हिंदू व मुस्लिम एकतेचा संदेश देण्यात साठी रमजान ईद साजरी करण्यात आले नायगाव तालुक्यातील टाकळी येथील मनोज मोरे यांच्या संकल्पनेतून काहाळा ,( खु )येथील मुस्लीम बांधवांना रमजान ईद निमित्त मिठाई पाटप करतं ईदच्या शुभेच्छा देण्यात आले आहे. नायगाव तालुक्यातील सर्व मुस्लिम बांधवांना बरबडा सर्कल मधिल व काहाळा येथे रमजान ईद मुबारक करत आनंद द्विगुणित केला आहे यावेळी मैनु शेख , वाहाहेद शेख , काहाळा येथील सरपंच सुनील लुगंरे, नागेश काहाळेकर त्याचबरोबर गावातील तरुण इत्यादी ची उपस्थिती होती. रमजान ईद कहाळा (खु ) येथे रमजान ईद च्या निमित्ताने सर्व मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## स्वारातीम विद्यापीठात 'प्रगत आण्विक जीवशास्त्र' प्रशिक्षण शिबिरास प्रारंभ

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात सात दिवसीय "प्रगत आण्विक जीवशास्त्र" प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन आज दि.२३ मार्च, २०२६ रोजी जैविकशास्त्र संकुलात संपन्न झाले. यावेळी, यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रगत तंत्रज्ञान आत्मसात करून अद्ययावत राहणे अत्यंत गरजेचे असल्याचे मत प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी व्यक्त केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (भारत सरकार) तसेच हाय मीडिया लॅबोरेटोरिज, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने सूक्ष्मजीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी हे सात दिवसीय प्रशिक्षण शिबिर २३ ते ३० मार्च, २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते झाले.

यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात प्रगत तंत्रज्ञानाची भर पडावी व त्यांनी आधुनिक संशोधन तंत्र आत्मसात करावे या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे सांगण्यात आले. अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या विषयातील नवनवीन तंत्रज्ञान आणि कौशल्य आत्मसात करणे आवश्यक असल्याचे सांगितले. जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास महत्त्वाचा असून आधुनिक संशोधन तंत्रज्ञानाचे ज्ञान असल्यास विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील आव्हाने समर्थपणे पेलता येतील, असेही त्यांनी नमूद केले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून हाय मीडिया लॅबोरेटोरिज, मुंबई येथील मनोजकुमार बोरसे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या व्यासपीठावर जैविकशास्त्र संकुलाचे संचालक व शिबिर संयोजक डॉ. बी. एस. सुरवसे तसेच सहसंयोजक डॉ. ए. पी. पाठक उपस्थित होते. या प्रशिक्षण शिबिरामध्ये पेशीमधून शुद्ध डीएनए वेगळा करणे, डीएनएमध्ये अचूक बदल करणे, डीएनए परिवर्तन, डीएनएच्या अनेक प्रती तयार करणे, एसडीएस-पेजद्वारे प्रथिनांचे विभाजन, आयन एक्सचेंज क्रोमॅटोग्राफी, अफिनिटी क्रोमॅटोग्राफी तसेच सदर्न ब्लॉटिंग यांसारख्या विविध प्रगत आण्विक तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणार आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बी. एस. सुरवसे यांनी केले. सूत्रसंचालन प्रतिभा ढवळे यांनी केले तर आभार प्रदर्शन समरीन पठाण यांनी केले. हे प्रशिक्षण शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. हेमलता भोसले, आयोजन सचिव डॉ. उमेश धुलधज, प्रतिभा ढवळे, डॉ. सुनील हजारे तसेच डॉ. मिलिंद गायकवाड, विद्या सुकरे, प्राजक्ता चांडोळकर, रुबिया शेख, गोविंद सूर्यवंशी, वसुधा कोडगिरे, खाजा मोईनुद्दीन, राजू शेरे, सुशील खरवडकर आणि राजकुमार हस्सेकर प्रयत्न करीत आहेत.

## वरदान ठरलेल्या आरोग्य शिबिरास दि २७ मार्च पासून प्रारंभ

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**



नांदेड येथील राजस्थानी एज्युकेशन सोसायटी यांच्या सहकार्याने व जय वकील फाउंडेशन, बीजे वाडिया चिल्ड्रन्स हॉस्पिटल मुंबई, कमल वाडिया फाउंडेशन, एनएच-एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटल मुंबई, अन्नम, एओसीएन इंडिया, यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या १५ वर्षापासून मेंदूचे विकार असणाऱ्या मुला-मुलींसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येते. या शिबिराचा हजारो रुग्णांना फायदा झाला असून हे शिबिर या रुग्णांसाठी वरदान ठरत आहे. या वर्षी हे शिबीर २९ वे शिबिर शुक्रवार दि. २७ मार्च पासून शहराच्या मगनपुरा नवा मोंढा येथील आर. आर. मालपाणी मतिमंद विद्यालयात आयोजित करण्यात आले असल्याची माहिती राजस्थानी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ओमप्रकाश गिल्डा, उपाध्यक्ष कमल कोठारी, सचिव प्रकाश मालपाणी, सहसचिव डॉ. लक्ष्मीकांत बजाज, कोषाध्यक्ष जयप्रकाश काबरा, सदस्य बनारसीदास अग्रवाल, अंकित अग्रवाल व शाळेचे मुख्याध्यापक मधुकर मनुरकर यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत माहिती दिली आहे. नवीन रुग्णांसाठी पूर्व नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. यासाठी नवीन रुग्णांनी आर. आर. मालपाणी मतिमंद विद्यालय, मगनपुरा नवा मोंढा नांदेड येथे प्रत्यक्ष जाऊन नोंदणी करावी तसेच शाळेत येणे शक्य नसणाऱ्या बाहेरगावच्या रुग्णांनी ८२०८११४८३२, ९०६७३७७५२० या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. या वर्षी शिबिराचे हे सोळावे वर्ष असून हे एकोणतीसावे शिबिर शुक्रवार दिनांक २७ व २८ मार्च या कालावधीत मगनपुरा, नवा मोंढा येथील आर. आर. मालपाणी मतिमंद विद्यालयात डॉ. अनैता हेगडे यांच्या प्रमुख मार्गदर्शनात त्यांची तज्ञ डॉक्टरांची टिम रुग्णावर उपचार करणार आहे. आत्तापर्यंतच्या अठ्ठावीस आरोग्य शिबिरात हजारो रुग्णांवर उपचार करण्यात आले. याचा तब्बल ७ हजारापेक्षा अधिक रुग्णांना लाभ झाला आहे.

नेत्रशस्त्रक्रियेमुळे दृष्टिहीन असलेल्या रुग्णांना दृष्टी मिळाली तर हाडांच्या शस्त्रक्रियेनंतर उभे राहण्यास असमर्थ असणाऱ्या रुग्णांना आता चालता येऊ लागले आहे. अनेक रुग्णांचे चालताना तोल जाणे, फिट्स येणे व ऑटीझम अशा मेंदूशी संबंधित आजारातून आरोग्य शिबिरात घेतलेल्या सातत्याने उपचारामुळे बहुतांश जणांनी आजारावर मात केली आहे तर अनेक जन उपचाराने आजारातून बरे होणार आहेत. हे आरोग्य शिबिर मेंदूचे विकार असणाऱ्या मुला-मुलींसाठी वरदान ठरले आहे. या शिबिरात उपचार घेण्यासाठी महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, कर्नाटक व तेलंगाना येथील राज्यातूनही मोठ्या संख्येने रुग्ण येत आहेत. प्रतिआरोग्य शिबिरात रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी राजस्थानी एज्युकेशन सोसायटीच्या वतीने निवास व जेवणाची व्यवस्था करण्यात येते. प्रतिवर्षाच्या शिबिराप्रमाणे या वेळीही रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय होऊ नये यासाठी संस्था पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शन व मुख्याध्यापक यांच्या नेतृत्वात आर. आर. मालपाणी मतिमंद व श्रीरामप्रताप मालपाणी मूकबधिर विद्यालयातील कर्मचारी जय्यत तयारी करीत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली असून या शिबीरास जास्ती जास्त लाभार्थी यांनी लाभ घ्यावा असे आवाहन मतीमंद विद्यालय मगनपुरा नवा मोंढा नांदेड चे मुख्याध्यापक आर आर मालपानी यांनी केले आहे.

## श्री स्वामी समर्थ पालखीचे बुधवारी पुण्यात आगमन (दि. २५ मार्च)

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट येथून श्री स्वामी समर्थ पालखीचे पुण्यात आगमन होत असून बुधवार दिनांक २५ मार्च रोजी सायंकाळी ६.३० वाजता मंडईमधील श्री शारदा गजानन मंदिरापासून भव्य पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. पालखी पादुका दर्शन सोहळ्यानिमित्त २९ मार्च पर्यंत महानगरपालिकेजवळील कॉंग्रेस भवन येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे आयोजन अण्णा थोरात, विनायक घाटे, नामदेवराव मोहिते, राजाभाऊ वरखडे, विलास चव्हाण यांनी केले आहे. महापौर मंजुषा नागपुरे आणि आमदार हेमंत रासने यांच्या हस्ते पालखी पादुका पूजन आणि आरती होऊन मिरवणूकीस प्रारंभ होईल.

## पुण्याची हरित उद्याच्या दिशेने धाव

**पुणे : (समर्थ गांवकरी)**




लखनौ, चंदीगड, भोपाळ, विशाखापट्टणम, बेंगळुरू, गुवाहाटी, कोलकाता, अहमदाबाद, तिरुवनंतपुरम, जयपूर, पटना, मुंबई, चेन्नई, हैदराबाद, भुवनेश्वर आणि नवी दिल्ली यांसारख्या शहरांमध्ये प्रभावी हरित चळवळ उभारल्यानंतर, एसबीआय ग्रीन मॅरेथॉन सीझन 6 ने उत्साही पुणे शहरात आगमन केले.

ताजेतवाने रविवारी सकाळी पीडब्ल्यूडी ग्राउंड येथे फिटनेस, सामुदायिक एकात्मता आणि पर्यावरण जागरूकतेचा उत्साहपूर्ण माहोल निर्माण झाला.

हजारो उत्साही धावपटूंनी एकत्र येत शाश्वततेसाठी धावण्याचा आणि हरित उद्यासाठी योगदान देण्याचा संकल्प केला. फिटनेस संस्कृती, सक्रिय रनिंग कम्युनिटी आणि शाश्वत जीवनशैलीवर वाढता भर यासाठी ओळखले जाणारे पुणे या देशव्यापी हरित उपक्रमासाठी आदर्श ठरले. शहरातील उत्साह आणि सहभागाने "हरित भारतासाठी धावा" या मॅरेथॉनच्या मूलभूत संकल्पनेला साजेशी साथ दिली.

५,००० हून अधिक सहभागी – अनुभवी धावपटू, विद्यार्थी, कुटुंबे, फिटनेसप्रेमी आणि संरक्षण दलाचे कर्मचारी – आरोग्य, सहनशक्ती आणि पर्यावरणीय जबाबदारी साजरी करण्यासाठी एकत्र आले. प्रत्येक पावलात पुण्याची आरोग्यदायी जीवनशैली आणि शाश्वत भविष्याबद्दलची बांधिलकी दिसून आली. या मॅरेथॉनला मान्यवरांच्या हस्ते औपचारिक सुरुवात करण्यात आली. श्री नंद किशोर सिंह – मुख्य महाव्यवस्थापक, एसबीआय; श्री राकेश कुमार यादव – महाव्यवस्थापक (नेटवर्क–III), एसबीआय; श्री अनिरुद्ध कुमार चौधरी – महाव्यवस्थापक (नेटवर्क–II), एसबीआय; श्री रविंद्र दुंडप्पा हितनल्ली – महाव्यवस्थापक (नेटवर्क–I), एसबीआय; श्री मनोज कुमार टाक – डीजीएम आणि सीडीओ, एसबीआय; तसेच श्री जयेश पाटील – बिझनेस डायरेक्टर, रेडिओ मिर्ची यांनी उपस्थित राहून बँकेची शाश्वतता, सामाजिक कल्याण आणि राष्ट्रनिर्मितीप्रती असलेली वचनबद्धता अधोरेखित केली.

## एण्ड टीव्हीच्या अभिनेत्रींचे स्किनकेअर टिप्स

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**



वाढत्या उष्णतेमुळे त्वचेवर होणाऱ्या परिणामांपासून संरक्षण करण्यासाठी योग्य स्किनकेअर रूटीन आवश्यक असल्याचे एण्ड टीव्हीवरील अभिनेत्री सीरत कपूर आणि विदिशा श्रीवास्तव यांनी सांगितले आहे. उन्हाळ्यात त्वचेची नैसर्गिक चमक टिकवण्यासाठी साधे, पण प्रभावी उपाय महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.'घरवाली पेडवाली' मालिकेत सावीची भूमिका साकारणाऱ्या सीरत कपूर म्हणाल्या की, त्या उन्हाळ्यात सौम्य जेल-बेस्ड क्लीन्सरचा वापर करून त्वचा स्वच्छ ठेवतात. "सनस्क्रीन हा माझ्या रूटीनचा सर्वात महत्त्वाचा भाग आहे. हलका, न चिकटणारा SPF वापरणे आणि दिवसातून वेळोवेळी तो पुन्हा लावणे आवश्यक असते," असे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर हायड्रेटिंग फेशियल मिस्ट आणि कोरफडीचे मॉइश्चरायझर त्वचेला ताजेपणा देतात, असेही त्या म्हणाल्या. शरीराला आतून हायड्रेट ठेवण्यासाठी नारळ पाणी आणि फळांचे सेवन करण्यावर त्यांनी भर दिला. सीरत यांनी केसांच्या निगेबाबतही सांगितले की, खोबरेल आणि बदाम तेलाने मसाज, सल्फेट-मुक्त शॅम्पूचा वापर आणि दही-मधाचा हेअर मास्क यामुळे केस निरोगी राहतात. उन्हाळ्यात हीट स्टायलिंग टाळून केस नैसर्गिकरित्या सुकवणे अधिक फायदेशीर ठरते, असे त्यांनी नमूद केले.

## प्री एस आय आर मॅपिंग तात्काळ पूर्ण करा : जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**



नांदेड दि. २३ मार्च नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे विशेष सखोल मतदार यादी पुनर्निरीक्षण कार्यक्रम २०२५ च्या निमित्ताने नांदेड दक्षिण आणि नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील सर्व राजकीय पक्षांचे जिल्हाध्यक्ष, जिल्हा सचिव, तालुका अध्यक्ष तालुका सचिव, सर्व नगरसेवक, आजी माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, रास्त भाव दुकानदार, पोलीस पाटील, निवडक बीएलओ आणि सर्व पर्यवेक्षक यांची कार्यशाळा आज संपन्न झाली. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी बोलताना सांगितले, अद्याप निवडणूक आयोगाने एस आय आर (SIR) कार्यक्रम जाहीर केला नसला. तरी त्या कार्यक्रमाची पूर्वतयारी म्हणून सर्व मतदारांची २००२ च्या मतदार यादीशी मॅपिंग करणे आवश्यक आहे. यासाठी निवडणूक विभागाने पर्यवेक्षक आणि बीएलओ यांची यंत्रणा कामाला लावली आहे. त्या माध्यमातून सर्व मतदारांनी आपले नाव २००२ च्या मतदार यादीशी मॅप करून घेणे गरजेचे आहे. सदर काम केवळ बीएलओ यांच्या प्रयत्नातून पूर्ण होणे थोडे कठीण आणि वेळखाऊ असल्यामुळे सर्व राजकीय पक्षांनी आप-आपले बूथ लेवल एजंट (बीएलए) प्रत्येक मतदान केंद्रावर नेमल्यास बीएलओ आणि बीएलए यांच्या समन्वयातून मॅपिंगचे हे काम सुलभ आणि लवकर पूर्ण करणे शक्य होणार आहे. यासाठी रास्त भाव दुकानदार, पोलिस पाटील यांची सुद्धा मदत घेण्यात येणार असून मॅपिंगची टक्केवारी लवकरात लवकर ९५ टक्केपर्यंत नेणे गरजेचे आहे. यासाठी सर्व राजकीय पक्षांनी सहकार्य करावे असे आवाहन यावेळी त्यांनी केले. उपजिल्हा निवडणूक अधिकारी राजकुमार माने यांनी एस आय आर नेमके काय आहे ? ते का आवश्यक आहे ? ते कसे करायचे आहे ? याबद्दलचे सविस्तर मार्गदर्शन उपस्थितांना केले. नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे मतदान नोंदणी अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी उपस्थित सर्व पर्यवेक्षक, पोलीस पाटील आणि रास्त भाव दुकानदार या सर्वांना पीपीटीच्या माध्यमातून एस आय आर निमित्त करावयाच्या कार्यवाहीचे प्रत्यक्ष सादरीकरण करून समजावून सांगितले. तसेच या संपूर्ण कार्यक्रमाच्या संदर्भात राजकीय पदाधिकारी, लोकप्रतिनिधी यांना असणाऱ्या शंका कुशंका, विविध समस्या - प्रश्नांचे समाधान यावेळेस डॉ. खल्लाळ यांनी केले. यावेळी मॅपिंगचे अति उत्कृष्ट काम करणारे बीएलओ आणि त्यांचे पर्यवेक्षक यांचा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

सदर कार्यशाळे वेळी नांदेड उत्तरचे मतदार नोंदणी अधिकारी कोळेकर, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार संजय वारकड, गट विकास अधिकारी, नांदेड मनपाचे अधिकारी यांची उपस्थिती होती.

या कार्यशाळेचे यशस्वी संयोजन नायब तहसीलदार नितीशकुमार बोलोलू यांनी केले. यावेळी कार्यशाळेचे सूत्रसंचालन अक्षय ढोके यांनी केले तर आभार नायब तहसीलदार इंद्रजीत गरड यांनी मानले.

# कॉमिक कॉन पुणे २०२५ मध्ये गेमिंगचा अनुभव वाढवला

## ब्रँडचा ईस्पोर्ट्स आणि भारतातील वाढत्या गेमिंग संस्कृतीशी दीर्घकालीन नाते दृढ करण्याचा प्रयत्न

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

रॉयल चॅलेंज पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने आपल्या 'क्रिकेट गेमिंग झोन सह पुणे कॉमिक कॉन 2025' मध्ये प्रचंड उत्साह वाढवला. या कार्यक्रमात ई-स्पोर्ट्स चाहत्यांपासून ते कॉस्प्लेअर्स आणि पॉप कल्चर प्रेमींपर्यंत सर्वजण सहभागी झाले. कॉमिक कॉन 21 ते 22 मार्च दरम्यान मेफिल्ड यश गार्डनमध्ये पार पडला. ब्रँडने या कार्यक्रमाद्वारे ई-स्पोर्ट्स क्षेत्रातील आपली वाढती रुची आणि भारतातील बदलती गेमिंग संस्कृती दाखवली.




रॉयल चॅलेंज पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने आपल्या रोमांचक 'क्रिकेट गेमिंग झोन'ला पुन्हा सादर करून कॉमिक कॉनमध्ये उपस्थितांना क्रिकेटचा अनुभव नवीन पद्धतीने अनुभवण्याची संधी दिली. चाहत्यांनी वर्ल्ड क्रिकेट चॅम्पियनशिप 3 मोबाइलवर, क्रिकेट 24 प्लेस्टेशन 5 वर, आणि पूर्णपणे इमर्सिव्ह व्हीआर क्रिकेट सेटअपसाठी लांब रांगा लावल्या. दोन्ही दिवस खेळांचे मैदान भरलेले राहिले.

उत्साह वाढवण्यासाठी, भारतातील आघाडीचे गेमिंग क्रिएटर्स, ज्यात 'स्काउट' यांचा समावेश होता, भेटी-सत्रे आणि मैत्रीपूर्ण प्रदर्शन मॅचेससाठी उपस्थित झाले. त्यांच्या सहभागामुळे स्पर्धात्मक ऊर्जा वाढली आणि चाहत्यांशी इनफ्लुएन्सर्सचा संबंध अधिक घट्ट झाला, ज्यामुळे देशातील वेगाने वाढत असलेल्या गेमिंग संस्कृतीवर सकारात्मक प्रभाव पडला.

वरुण कुरीच, वाइस प्रेसिडेंट-मार्केटिंग आणि पोर्टफोलिओ हेड, डियाजियो इंडिया, म्हणाले:" कॉमिक कॉनहे क्रिएटिव्हिटी, कम्युनिटी आणि धाडसी अभिव्यक्ती एकत्र आणते, त्यामुळे गेमर्सच्या नवीन पिढीशी जोडले जाण्यासाठी हे एक योग्य ठिकाण आहे. गेमिंग आता फक्त एखादे छंद राहिलेले नाही; हे तर तरुण भारत कसे संवाद साधतो, स्पर्धा करतो आणि आपली ओळख बनवतो, यावर प्रभाव टाकते. कॉमिक कॉन मध्ये रॉयल चॅलेंज पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरसह आमचा सहभाग क्रीडा क्षेत्रातील आमच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. क्रिकेट डिजिटल प्लॅटफॉर्मवर जशी विकसित होत आहे, हे पाहता आम्हाला नव्या पिढीच्या गेमर्सला पाठिंबा देऊन या सांस्कृतिक बदलाचा भाग व्हायचा आहे."

पुण्यतिल कॉमिक कॉन 2026 मध्ये कॉमिक्स, कॉस्प्ले, संग्रहणीय वस्तू आणि क्रिएटर्सच्या सहभागाचा एक खास संगम पाहायला मिळाला. या महोत्सवादरम्यान 'रॉयल चॅलेंज' या पॅकेज्ड वॉटरच्या परतावामुळे कॉमिक कॉन इंडियासोबतचा ब्रँडचा संबंध अधिक दृढ झाला आणि ई-स्पोर्ट्स व गेमिंग क्षेत्रांमध्ये त्याची उपस्थिती वाढली.

अक्षत राठी, सह-संस्थापक आणि एमडी, नॉडविन गेमिंग, म्हणाले:" कॉमिक कॉन इंडिया पॉप कल्चरच्या प्रत्येक पैलूला एकत्र आणते.

यावर्षी, रॉयल चॅलेंज पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने क्रिकेट गेमिंग झोनच्या माध्यमातून काहीतरी नवीन आणले आणि चाहत्यांना थेट स्पर्धात्मक गेमिंगमध्ये सहभागी होण्याचा थरार अनुभवण्याची संधी दिली. याला मिळालेला प्रतिसाद अप्रतिम होता आणि संपूर्ण आठवडाभर दिसलेल्या उत्साहावरून येथील प्रेक्षकांमध्ये गेमिंग किती लोकप्रिय आहे हे दिसून आले.

# सीएनजीच्या कामांना प्राधान्य; एलपीजी पुरवठा सुरळीत ठेवण्याच्या सूचना

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

देशभरातील सीएनजी प्रकल्पांशी संबंधित कामांना प्राधान्याने गती देण्याच्या सूचना केंद्र सरकारकडून देण्यात आल्या आहेत. यासोबतच एलपीजी (LPG) पुरवठ्यात उद्भवणाऱ्या अडचणी दूर करून नागरिकांना अखंडित सेवा देण्यावरही भर देण्यात आला आहे. अशी माहिती भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते आणि पेट्रोल डीलर असोशीएशनचे राष्ट्रीय सदस्य अली दारूवाला यांनी दिली. केंद्र सरकारच्या संबंधित विभागाकडून राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना पाठवलेल्या पत्रामध्ये सी एन जी पायाभूत सुविधा उभारणीतील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामध्ये पाइपलाइन टाकणे, परवानग्या, रस्ते खोदकाम मंजुरी आणि विविध विभागांमधील समन्वय यावर विशेष लक्ष देण्यास सांगितले

- आपत्कालीन सेवा असतानाही ९ लाख नागरिकांपर्यंत जाणारी गॅस पाईप लाइन रखडलेली

आहे. तसेच, एलपीजी पुरवठ्याबाबत काही भागांत निर्माण होणाऱ्या अडचणींचा आढावा घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. वितरण व्यवस्थेत सुधारणा करून ग्रामीण व शहरी भागांमध्ये गॅस उपलब्धता सुरळीत ठेवण्याचे उद्दिष्ट आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारे, स्थानिक स्वराज्य संस्था आणि संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करून नागरिकांना सुरक्षित, परवडणारी आणि अखंडित ऊर्जा सेवा उपलब्ध करून द्यावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. पुणे, पिंपरी - चिंचवड शहरात काही सोसायटयांना थेट पाईप लाईनद्वारे गॅस पुरवठा केला जातो. शहरात महानगर गॅस लिमिटेडने यासाठी पुढाकार घेतला आहे. हडपसर भागात पाईप लाइन द्वारे गॅस पुरवठा करण्यात येणार आहे, मात्र पुलगेट येथे सायकल ट्रॅक खोदायचा की नाही या वादात सदरील काम रखडले आहे. हा प्रश्न सुटला तर ९ लाख नागरिकांना आणि २५ हजार रिक्षा चालकांना गॅस मिळणार आहे. महानगर गॅस लि. कंपनी महापालिकेकडे पैसे भरायला तयार आहे, मात्र पालिका प्रशासन दाद देत नाही, तसेच महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे पाठपुरावा करूनही प्रश्न सुटला नाही. आज गॅस पुरवठा करण्यास अडथळे आले तर एस्मा कायदा लागू करण्यात आला आहे. यामुळे महापालिकेने तत्काल मार्ग काढावा अशी मागणी अली दारूवाला यांनी केली आहे.

# 'नासा' इंडियाच्या प्रदर्शन सादरीकरणात बीएनसीएला सर्वोत्कृष्टतेचा पुरस्कार



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या डॉ. भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वूमेनने (बीएनसीए) नुकतेच नॅशनल असोसिएशन ऑफ स्टूडंट्स ऑफ आर्किटेक्चर (नासा, इंडिया) तर्फे आयोजित केलेल्या महाराष्ट्र पातळीवरील प्रदर्शनातील सादरीकरण स्पर्धेत शैक्षणिक विषयावरील सर्वोत्कृष्ट सादरीकरणाचा पुरस्कार पटकावला. हे सादरीकरण 'नासा' इंडियाच्या विभाग तीन मधील वास्तूरचनाशास्त्र (आर्किटेक्चर) महाविद्यालयांसाठी आयोजित केले आहे. हे सादरीकरण बीएनसीएतील तिसऱ्या वर्षात शिकत असणाऱ्या मोहिनी मांडके आणि चौथ्या वर्षातील अनन्या समनपुरे या विद्यार्थिनींनी केले. बीएनसीएचे प्राचार्य डॉ. अनुराग कश्यप यांनी या पुरस्काराबद्दल सहभागी विद्यार्थिनी आणि प्राध्यापकांचे अभिनंदन केले. तर महाविद्यालयातील 'नासा' विभागप्रमूख प्रा. महेश बांगड यांनी आनंद व्यक्त केला. 'नासा' इंडियाच्या या स्पर्धेत पुण्यातील ब्रिक कॉलेज ऑफ आर्किटेक्चरने विशेष पुरस्कार मिळवला. तसेच या स्पर्धेतील महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्रातील दस्तावेजीकरण या विषयावरील प्रदर्शनाच्या सादरीकरणात कोल्हापूर येथील डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चरने सर्वोत्कृष्ट सादरीकरणाचा पुरस्कार मिळवला.

'नासा' तर्फे आयोजित करण्यात आलेले हे प्रदर्शन पाहण्यासाठी येत्या २५ मार्चपर्यंत भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ आर्किटेक्चरमध्ये नागरिकांसाठी खुले ठेवण्यात आले आहे. छायाचित्राच्या ओळी 'नासा' इंडियाच्या प्रदर्शन सादरीकरणात बीएनसीएच्या विद्यार्थिनी दिसत आहेत.

# हृदयामधील दुर्मिळ जन्मजात रक्तवाहिनीच्या विकारावर यशस्वी उपचार

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

अवघ्या दीड वर्षाच्या एका मुलीच्या हृदयामधील दुर्मिळ जन्मजात रक्तवाहिनी संबंधीच्या विकारावर विश्वराज हॉस्पिटल, लोणी येथील डॉक्टरांच्या पथकाने ट्रान्सकॅथेटर डिव्हाईस क्लोजर ही प्रक्रिया यशस्वीरित्या केली. बाल हृदयविकार तज्ज्ञ डॉ. आशिष बनपूरकर यांच्या नेतृत्वाखाली ही कमीत कमी छेद असलेली हृदयविकार प्रक्रिया करण्यात आली. याबाबत अधिक माहिती देताना डॉ. आशिष बनपूरकर म्हणाले की, या मुलीच्या रक्तातील अमोनियाचे प्रमाण थोडे वाढल्यामुळे तिला रुग्णालयात दाखल करावे लागले व निरीक्षणाखाली ठेवले होते. हे प्रमाण सुरुवातीला औषधोपचारांनी नियंत्रित करण्यात आले. चालू तपासण्यांमध्ये या मुलीला ॲबर्नथी मालफॉर्मेशन ही दुर्मिळ स्थिती असल्याचे निदान केले.



याला कॉजीनेंटल पोर्टोसिस्टिमिक शंट असे देखील म्हंटले जाते.एका सामान्य लहान मुलामध्ये पोटातील व आतड्यांमधील रक्त हे यकृताकडे पोर्टल व्हेन्सच्या मार्गातून जाते. हृदयात जाण्यापूर्वी येथे त्याचे शुद्धीकरण होते. मात्र याबाबतीत यकृताकडे न जाता पोर्टल व्हेन्स या असामान्यरित्या थेट वेना कावा या शरीरातील मोठ्या रक्तवाहिनीच्या मार्गातून थेट हृदयाशी जोडल्या गेल्या होत्या. या स्थितीमुळे यकृतातील रक्तप्रवाह नीट विकसित झाला नव्हता आणि फुफ्फुसात उच्च रक्तदाब, असामान्य रक्ताभिसरण विकसित होण्याचा धोका होता. त्यामुळे ही असामान्य स्थिती दुरूस्त करणे आवश्यक होते. "ही स्थिती अत्यंत दुर्मिळ असून, सुमारे प्रत्येक पन्नास हजार जन्मांपैकी एका मुलामध्ये आढळतो," असे डॉ. बनपूरकर यांनी सांगितले. "वेळीच उपचार न केल्यास यामुळे यकृत, फुफ्फुसे आणि शरीराच्या चयापचय प्रक्रियेवर गंभीर परिणाम होऊ शकतात." असेही ते म्हणाले. मुलीची शारीरिक स्थिती, रक्त तपासण्या आणि यकृताच्या कार्याचे बारकाईने परीक्षण केल्यानंतर डॉक्टरांनी कॅथेटरच्या मदतीने दोष दूर करण्याचा (ट्रान्सकॅथेटर डिव्हाईस क्लोजर) ही कमीत कमी छेद असलेली प्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. या प्रक्रियेदरम्यान डॉक्टरांनी रक्तवाहिनीतून कॅथेटर घालून शिरांमधील रक्ताचा दाब तसेच रक्तप्रवाहाच्या गतीचे अँजिओग्राफी द्वारे मोजमाप केले.

विशेष ऑक्लूजन डिव्हाइस बसवून रक्त जाण्याचा चुकीचा मार्ग बंद करण्यात आला. प्रक्रियेनंतरच्या इमेजिंग आणि सोनोग्राफीमध्ये उपकरण योग्य ठिकाणी बसवल्याचे आणि यकृताकडे रक्तप्रवाह पुन्हा सुरू झाल्याचे दिसून आले.

# सीआयआय पश्चिम विभाग वार्षिक बैठक

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय), पश्चिम विभाग, बुधवार, २५ मार्च रोजी आपली वार्षिक बैठक २०२६ आयोजित करेल, ज्यामध्ये 'पश्चिमेचा विकास: वाढ, नावीन्य आणि जागतिक स्पर्धात्मकतेला चालना' या विषयावर एक परिषद आयोजित केली जाईल. या शिखर परिषदेत उद्योगपती, धोरणकर्ते, विचारवंत आणि स्टार्ट-अप्स एकत्र येऊन भारताच्या परिवर्तनाच्या प्रमुख चालकांवर, जसे की उत्पादन, नावीन्य, शाश्वतता आणि जागतिक स्पर्धात्मकता यावर चर्चा करतील. देशाच्या औद्योगिक आणि निर्यात वाढीमध्ये पश्चिम भारताची महत्त्वाची भूमिका आहे, ज्यामुळे भारताच्या जागतिक आर्थिक स्थानासाठी ही चर्चा महत्त्वपूर्ण ठरते.

# स्मार्ट आणि 'ऑल-इन-वन' स्वयंपाकाच्या एका नव्या युगाची सुरुवात

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

फिलिप्स होम अप्लायन्सेसने फिलिप्स वनशेफ सादर करण्याची घोषणा आज केली. स्वयंपाकासाठी हे एक नावीन्यपूर्ण, सर्वसमावेशक स्मार्ट उपकरण असून, रोजचा स्वयंपाक सोपा करण्यासोबतच भारतीय घरांसाठी पाककलेचे नवनवीन पर्याय करून पाहण्यासाठी ते तयार करण्यात आले आहे.




रणवीर ब्रार यांनी मुंबईतआयोजित केलेल्या 'शेफ्स टेस्टिंग टेबल' या कार्यक्रमात याचे उद्घाटन झाले. पदार्थांची चव पाहून, इंटरॅक्टिव्ह फूड स्टेशन्सच्या माध्यमातून भारतातील विविध खाद्यसंस्कृतींचा आस्वाद घेण्यासाठी पाहुण्यांना या कार्यक्रमात आमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रमादरम्यान, ब्रार यांनी वर्सुनी इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. गुलबहार तौरानी यांच्यासोबत भारतीय पदार्थांच्या चवीशी कुठेही तडजोड न करता स्वयंपाकघरातील आधुनिक तंत्रज्ञान क्लिष्ट पाककृती कशा सहज- करू शकते, हे दाखवून दिले.

हे लॉन्च म्हणजे आधुनिक भारतीय स्वयंपाकघराची पुनर्कल्पना करण्याच्या दिशेने फिलिप्सने टाकलेले नवीन पाऊल आहे. 'वनशेफ'मध्ये 33 स्मार्ट कुकिंग फंक्शन्स एकाच उपकरणात कार्यरत आहेत. प्रगत 'अँबीहीट' तंत्रज्ञान वापरण्यात आलेले हे उपकरण, योग्य तापमान आणि एकसमान उष्णतेचा वापर करून विविध पदार्थ तसेच स्वयंपाकाच्या टप्प्यांनुसार स्वतःला जुळवून घेते. यामुळे रोजच्या साध्या जेवणापासून ते सणासुदीच्या खास पदार्थांपर्यंत, विविध प्रकारच्या पाककृतींमध्ये एकसारखी चव आणि उत्तम स्वाद मिळतो.

लाँचप्रसंगी गुलबहार तौरानी म्हणाले, "भारतीय घरांमध्ये प्रत्यक्षात स्वयंपाक कसा केला जातो हे समजून घेणे आणि त्यांच्या रोजच्या सवयीच्या गोष्टींमध्ये सहज सामावले जाणारे उपकरण डिझाइन करणे, यावर आमचे नेहमीच लक्ष राहिले आहे. भारतीय स्वयंपाक अत्यंत वैविध्यपूर्ण आणि अनेकदा वेळखाऊ असतो. म्हणूनच चवीशी तडजोड न करता प्रक्रिया सुलभ करणारे उपाय अधिकाधिक महत्त्वाचे ठरतात. वनशेफच्या माध्यमातून, आम्ही स्वयंपाकाची अनेक तंत्रे एकाच इंटेलिजेंट प्लॅटफॉर्मवर आणू इच्छितो, जो रोजच्या स्वयंपाकाला अधिक सहज आणि चविष्ट बनवतो. व्यावहारिक आणि उद्देशपूर्ण अशा दोन्ही नावीन्यपूर्णतेद्वारे आधुनिक भारतीय स्वयंपाकघराची पुनर्कल्पना करण्याच्या आमच्या व्यापक वचनबद्धतेचे हे प्रतीक आहे."

# नवगतीने पीडीएपी एजीएम २०२६ मध्ये पेट्रोलियम डीलर्ससाठी 'एव्हेग प्रो' सादर केले

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतातील अग्रगण्य फ्युएल-टेक स्टार्टअप नवगतीने पेट्रोल पंप डीलर्ससाठी 'एव्हेग प्रो' हे नवीन डिजिटल प्लॅटफॉर्म लॉन्च केले. या डिजिटल प्लॅटफॉर्मचे लाँच पुण्यात झालेल्या पेट्रोल डीलर्स असोसिएशन पुणे (पीडीएपी) 2026 च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत (एजीएम) करण्यात आले. या प्लॅटफॉर्ममुळे पेट्रोल पंप व्यवसाय अधिक डिजिटल आणि आधुनिक होण्यास मदत होणार आहे. हे प्लॅटफॉर्म खास भारतीय फ्युएल रिटेल क्षेत्रासाठी तयार करण्यात आले आहे.




एव्हेग प्रो हे पेट्रोलियम डीलर्सना येणाऱ्या अनेक दैनंदिन अडचणी सोडवण्यासाठी तयार करण्यात आले आहे. यामध्ये विक्रीचे हाताने हिशेब जुळवणे, स्टॉकमधील फरक तपासणे, फ्लीट बिलिंग, रोख आणि इतर पेमेंटमधील फरक, रोजच्या तपासणीच्या नोंदी आणि क्रेडिट जोखीम यांचा समावेश आहे. हे सर्व महत्त्वाचे काम एकाच डिजिटल सिस्टीममध्ये करता येतात. त्यामुळे पेट्रोल पंपाचे संपूर्ण कामकाज सोपे आणि अधिक व्यवस्थित होते.

हे प्लॅटफॉर्म इंधन विक्रेत्यांना विक्री, शिफ्ट व्यवस्थापन आणि एसएल5 नॉझलचे हिशेब (रिकन्सिलिएशन) सहजपणे सांभाळण्यास मदत करते. तसेच, यात लाईव्ह इन्व्हेंटरी ट्रॅकिंग, स्टॉकमधील फरक नियंत्रण, डिजिटल फ्लीट करार, एकत्रित बिलिंग, क्रेडिटवर लक्ष ठेवणे, व्हाउचर व्यवस्थापन आणि रिअल-टाइम बॅलन्स शीट पाहण्याची सुविधा उपलब्ध आहे. भारतातील पेट्रोलियम रिटेल व्यवसायातील गुंतागुंत लक्षात घेऊन हे प्लॅटफॉर्म तयार करण्यात आले आहे. यात व्हॅट, जीएसटी, सेस आणि सरचार्ज यांचे व्यवस्थापनही करता येते, त्यामुळे डीलर्सना अचूक आणि ऑडिटसाठी तयार आर्थिक नोंदी ठेवणे सोपे जाते. या लाँचबद्दल बोलताना नवगतीचे सह-संस्थापक आणि सीईओ वैभव कौशिक म्हणाले, "एव्हेग प्रो हे इंधन विक्रेत्यांच्या रोजच्या कामातील अडचणी सोडवण्यासाठी उपाय तयार करण्याच्या आमच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे प्रतीक आहे. भारतात अजूनही इंधन विक्री व्यवसायात अकाउंटिंग, स्टॉक तपासणी, ताळमेळ (रिकन्सिलिएशन) आणि ग्राहकांच्या क्रेडिट व्यवस्थापनासाठी वेगवेगळ्या आणि हाताने चालणाऱ्या पद्धती वापरल्या जातात. एव्हेग प्रो द्वारे आम्ही ही सर्व कामे एकाच प्लॅटफॉर्मवर आणत आहोत, ज्यामुळे विक्रेत्यांना अधिक स्पष्टता, नियंत्रण आणि कार्यक्षमतेने काम करता येईल." नवीन प्लॅटफॉर्मबद्दल बोलताना नवगतीचे सह-संस्थापक आलाप नायर म्हणाले, "एव्हेग प्रो हे भारतातील इंधन विक्री व्यवसायाच्या दैनंदिन कामकाजाच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आले आहे. शिफ्टनुसार हिशेब ठेवणे, स्टॉक ट्रॅकिंग, फ्लीटसाठी एकत्रित बिलिंग आणि लाईव्ह आर्थिक अहवाल या सर्व गोष्टी सोप्या करण्यासाठी हे प्लॅटफॉर्म तयार आहे. यामुळे कामातील गुंतागुंत कमी होईल आणि निर्णय घेणे अधिक सोपे होईल. आमचा उद्देश डीलर्सनी हाताने चालणाऱ्या (मॅन्युअल) पद्धती सोडून अधिक स्मार्ट आणि वाढत्या व्यवसायासाठी योग्य अशा पद्धती वापराव्यात हा आहे."

# आ. शेखर निकम यांची मुख्यमंत्र्यांशी भेट; विकासकामांवर चर्चा



**चिपळूण : (समर्थ गांवकरी)**

चिपळूण-संगमेश्वर मतदारसंघाचे आमदार शेखर निकम यांनी सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन मतदारसंघातील विविध विकासकामांबाबत चर्चा केली. राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना झालेल्या या भेटीत पायाभूत सुविधा, प्रलंबित प्रकल्प तसेच स्थानिक प्रश्नांवर सविस्तर संवाद साधण्यात आला. यावेळी निकम यांनी काही महत्त्वाची निवेदनेही मुख्यमंत्र्यांकडे सादर केली. मुख्यमंत्र्यांनी संबंधित मागण्यांवर सकारात्मक भूमिका दर्शवित आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे.

### उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडची मुंबई इंडियन्ससोबत टी20 लीग 2026 साठी अधिकृत बँकिंग पार्टनर म्हणून भागीदारी

# खेळाला ताकद अन् देशाचे सक्षमीकरण

- उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँकने टी20 लीग 2026 साठी मुंबई इंडियन्ससोबत अधिकृत बँकिंग पार्टनर म्हणून भागीदारी केली
- उत्कर्ष एसएफबीएल आणि मुंबई इंडियन्सचे वरिष्ठ अधिकारी या प्रसंगी उपस्थित होते
- ही भागीदारी क्रिकेट चाहत्यांमध्ये बँकेची राष्ट्रीय पातळीवरील पोहोच मजबूत करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा आहे

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड (उत्कर्ष एसएफबीएल) ची टी-२० २०२६ च्या लीगसाठी 'मुंबई इंडियन्स'चे अधिकृत बँकिंग भागीदार म्हणून निवड झाली असून बँकेने या महत्वपुर्ण भागीदारीची घोषणा आज केली. बँकेसाठी हा धोरणात्मक भागीदारीचा अतिशय महत्त्वपूर्ण टप्पा आहे. या भागीदारीच्या माध्यमातून बँक आपली राष्ट्रीय स्तरावरील ओळख वाढवण्याबरोबरच देशभरातील कोट्यवधी क्रिकेट चाहत्यांशी आपले नाते अधिक दृढ करत आहे.




सदर घोषणेसाठी आयोजित विशेष कार्यक्रमाला उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गोविंद सिंग, मुख्य वित्त अधिकारी श्री. सरजुकुमार प्रवीण सिमारिया आणि कन्झ्युमर बँकिंग प्रमुख श्री. सौरभ घोष तसेच मुंबई इंडियन्स फ्रँचायझीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. श्री गोविंद सिंग, व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी, उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड या ऐतिहासिक भागीदारीबद्दल बोलताना म्हणाले, "मुंबई इंडियन्ससारख्या संघासोबत भागीदारी करताना आम्हाला आनंद होत आहे कारण हा एक असा संघ आहे ज्यांनी कामगिरी, नेतृत्व आणि चाहतावर्गाशी संवाद यात सातत्याने नवे मापदंड प्रस्थापित केले आहेत. ही भागीदारी देशभरातील ग्राहकांशी अधिक मजबूत नाते निर्माण करण्याच्या आमच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे, तसेच, देशातील या अत्यंत लोकप्रिय क्रीडा व्यासपीठामुळे आमच्या ब्रँडची ओळख जनसामान्यात अधिक मजबूत होणार आहे."

मुंबई इंडियन्सच्या प्रवक्त्याने या भागीदारीबद्दल बोलताना सांगितले की, "उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँकचे मुंबई इंडियन्स परिवारात स्वागत करताना आम्हाला आनंद होत आहे. त्यांची मजबूत मूल्ये, ग्राहक-केंद्रित दृष्टिकोन आणि आर्थिक समावेशनाबाबतची बांधिलकी आमच्या विचारसरणीशी सुसंगत आहे. आम्ही प्रभावी भागीदारीची अपेक्षा करतो."

या भागीदारीचा एक भाग म्हणून, उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँकेचे उद्दिष्ट विविध ग्राहक वर्गांशी आपला संवाद आणि सहभाग वाढवणे, तसेच या हंगामादरम्यान राबवल्या जाणाऱ्या एकात्मिक मार्केटिंग उपक्रमांद्वारे व इतर नियोजित कार्यक्रमांद्वारे आपल्या ब्रँडची उपस्थिती अधिक ठळक करणे आहे.